एकात्मिक बाल विकास सेवा योजना (मानधन व आहार खर्च) या योजनेसाठी उपलब्ध केलेला निधी वितरित व खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१७/प्र.क्र.३०८/का.५
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १५ फेब्रुवारी, २०१८

वाचा :- वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दि.६ फेब्रुवारी,२०१८.

प्रस्तावना :-

महिला व बाल विकास विभागामार्फत एकात्मिक बाल विकास सेवा योजना (आहार खर्च) (लेखाशिर्ष २२३६ १९४५) ही योजना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई या कार्यालयाकडून राबविण्यात येत आहे.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात एकात्मिक बाल विकास सेवा योजना (मानधन व आहार खर्च (अतिरिक्त राज्य हिस्सा १०० टक्के) (लेखाशिर्ष २२३६ १९४५) याखाली अर्थसंकल्पीत करण्यात आलेला निधी वितरीत व खर्च करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजना (मानधन व आहार खर्च (अतिरिक्त राज्य हिस्सा १०० टक्के) (लेखाशिर्ष २२३६ १९४५) (१९ आहार खर्च) याखाली रु.४.२८५० कोटी (अक्षरी रुपये चार कोटी अठ्ठाविस लाख पंन्नास हजार फक्त) इतका निधी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना वितरीत करण्यास व खर्च करण्यास शासन मान्यता देत आहे.

सदर योजना राबविण्याबाबत दिलेल्या मार्गदर्शक सूचना नुसार सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पित केलेल्या उपलब्ध तरतुदीतून वितरीत करावयाच्या व खर्च करावयाच्या निधीचा लेखाशिर्षनिहाय तपशील खालील प्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

लेखाशिर्ष	आयुक्त,ए.बा.विकास सेवा योजना यांना वितरीत करावयाचा निधी
२२३६ १९४५	४२८.५०
एकुण	**४२८.५०**

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१६१५५०१०७३३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.02.16 15:58:23 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मंत्री/राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधानपरिषद), विधानभवन,मुंबई.
३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहाय्य, मंत्रालय, मुंबई-३२
४) सचिव (महिला व बालविकास विभाग), मंत्रालय, मुंबई.
५) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई.
७) सर्व जिल्हाधिकारी.
८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
९) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास.
१०) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
११) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी).
१२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
१३) सर्व महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद.
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
१६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१७) कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (का.१४७२)/ वित्त विभाग (व्यय-६) मंत्रालय, मुंबई
१८) कक्ष अधिकारी (का-४) महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) निवड नस्ती (कार्यासन-५).
